निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : ७७ वा
गुरूवार -२२ मे २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## मान्सून काळात आपत्ती उद्भवल्यास निवारणासाठी महाराष्ट्र सज्ज - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**
**मुंबई/ प्रतिनिधी/** मान्सूनच्या काळात एखादी आपत्ती निर्माण झाल्यास त्याचा सामना करण्यासाठी प्रशासन सज्ज आहे. त्यादृष्टीने सर्वच यंत्रणांनी योग्य तयारी केली आहे. यंदाच्या मान्सूनच्या काळात जीवित आणि मालमत्तेचे नुकसान रोखण्यासाठी काम करावे. आपत्तीच्या काळात सर्व प्रशासकीय अधिकारी यांनी जबाबदारी म्हणून मुख्यालयाच्या संपर्कात राहून २४ तास शनिवार व रविवारीही दक्ष राहून काम करावे. आपत्तीच्या काळात तातडीने प्रतिसाद द्यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मंत्रालयातील परिषद सभागृहात मान्सूनपूर्व तयारी आढावा बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.आपत्ती निवारण ही आपणा सर्वांची जबाबदारी असल्याचे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आपत्तीच्या वेळी तात्काळ प्रतिसाद देणे महत्वाचे आहे. त्यासाठीची कार्यपद्धती योग्यरित्या राबवावी. पश्चिम महाराष्ट्रामध्ये यंदा ११० ते ११९ टक्के पावसाचा आंदाज आहे. जास्ती पावसाचा अंदाज पाहता सांगली आणि कोल्हापूर महानगरपालिकांनी विशेष तयारी ठेवावी. राज्यातील सर्वच महानगरपालिकांनी फ्लॅश फ्लड सारख्या संकटांचा सामना करण्यासाठी आराखडा तयार करावा. राज्यातील दरड प्रवण क्षेत्राचे नव्याने मॅपिंग करणे गरजेचे आहे. गेल्या काही वर्षांमध्ये घडलेल्या घटनांचा विचार करता मॅपिंगमध्ये नसलेल्या ठिकाणीही दरडी कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत.

दरड कोसळण्याच्या जागी तातडीने सुरक्षा उपाययोजना कराव्यात. यात जिल्हाधिकारी यांनी प्रामुख्याने लक्ष घालावे. मुंबईत दरड प्रवण अशी एकूण २४९ ठिकाणे आहेत. याबाबत सर्वच संबंधित यंत्रणांनी तातडीने उपाययोजना कराव्यात. आपत्तीकाळात बचावकार्यासाठी पुरवण्यात आलेल्या साहित्याचे मॉकड्रिल घ्यावे, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गेल्या अनेक वर्षापासून आपण आपत्ती निवारणाचे काम करत आहोत. त्यामुळे त्याच त्या आपत्ती पुन्हा येणार नाहीत यासाठी दक्ष रहावे व तसे नियोजन करावे. जलसंपदा विभागाने धरणांमधील पाण्याच्या विसर्गासाठी आंतरराज्य समन्वय ठेवावा. अशा समन्वयातून पुराचा धोका कमी करण्यास मदत होते. तसेच ज्या ठिकाणी दरड कोसळणे किंवा पूर यामुळे संपर्क तुटतो अशा ठिकाणी रेशनचा अधिकचा साठा पुरवण्यात यावा. तसेच अशा भागातील गर्भवती महिलांना आपत्ती पुर्वीच सुरक्षित स्थळी अथवा रुग्णालयांमध्ये हलवण्यात यावे. जेणेकरून कोणताही अवनस्थ प्रसंग उद्भवणार नाही. विद्युत विभागाने त्यांची सर्व यंत्रणा सुस्थितीत असल्याचे तपासून घ्यावे, राज्यातील आपत्ती प्रवण भागांचे अद्ययावत नकाशे हवाई दलास द्यावेत, महानगरपालिकेने रस्त्यांची कामे करताना लावलेले आडथळे पावसाळ्यापूर्वी काढून टाकावेत, पश्चिम द्रुतगती मार्गावर ज्याठिकाणी पाणी साठते तेथे दक्षता घेण्यात यावी. धोकादायक इमारतीमधील रहिवाशांचे स्थलांतर करावे अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, आपल्यासाठी प्रत्येकाचा प्राण महत्वाचा आहे. सर्व महानगरपालिकांनी नाले सफाई करावी. पाणी साचणाऱ्या ठिकाणी पंप बसवावेत, मुंबईत दरड प्रवण भागात डोंगरकड्यांना जाळ्या बसवाव्यात, धोकादायक ठिकाणी फलक लावावेत, पोलिसांनी अशा ठिकाणी जाण्यापासून पर्यटकांना रोखावे अशा सूचना ही त्यांनी केल्या.बैठकीमध्ये सर्वच विभागांनी संगणकीय सादरीकरणाच्या माध्यमातून तयारीसंदर्भातील माहिती दिली. त्यामध्ये लष्कराच्या ३८ तुकड्या तैनात असणार असल्याची माहिती लष्कराच्या प्रतिनिधींनी दिली. तसेच चेतक आणि नौदलाचे हलिकॉप्टर सज्ज असणार आहे.

नौदल आणि बीएमसी यांची हॉटलाईन असणार आहे, भारतीय हवाई दल सुद्धा सुसज्ज असून कोस्टगार्ड, एनडीआरएफ, एसडीआरएफ, रेल्वे, मुंबई पोर्ट ट्रस्ट, जेएनपीटी, ऊर्जा विभाग, मुंबई महापालिका, मुंबई पोलिस यांनीही मान्सूनसाठी केलेल्या तयारीची माहिती दिली.या बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्यासह नौदल, वायुलद, सैन्यदल, सागरी सुरक्षा दल, एनडीआरअफ, एसडीआरएफ, जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टचे अधिकारी आणि सर्व संबंधित विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, अधिकारी उपस्थित होते.

## सायबर भामट्यांच्या बनावट नोकर भरती विरोधात महावितरणने केली तक्रार

**आत्ताच एक्सप्रेस**
छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी/ सायबर भामट्यांनी महावितरणची बनावट वेबसाईट बनवून नोकरभरतीची जाहिरात केल्याबद्दल महावितरणने सायबर क्राइम विभागाकडे तक्रार केले आहे. लोकांनी या बनावट जाहिरातीला बळी पडू नये, असे आवाहन महावितरणने केले आहे. फसवणूक करण्याच्या उद्देशाने सायबर भामट्यांनी www.mahavitaran-maharashtra.com ही बनावट वेबसाईट तयार करून यात शिपाई, वॉचमन, वाहतूक कामगार व सफाई कामगार या पदाच्या भरतीसाठी अर्ज मागविले आहेत. याविरोधात महावितरणने सायबर क्राइम विभागाकडे तक्रार केली असून सायबर भामट्यांच्या प्रलोभनाला बळी पडू नये, असे आवाहन केले आहे.

## वैजापूर शहरातील घाणीचे साम्राज्य दूर करा

**आत्ताच एक्सप्रेस**
**वैजापूर/प्रतिनिधी** / वैजापूर शहरातील घाणीचे साम्राज्य दूर करा या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षातर्फे शहराध्यक्ष जुबेर चाऊस यांनी बुधवार दि.२१ रोजी मंगळवारी मुख्याधिकारी संगीता नांदुरकर यांना निवेदन दिले. या निवेदनात म्हटले आहे की सध्या अवकाळी पावसाने थैमान घातले असून घाणीमुळे जागोजागी गटारी तुंबून नागरिकांच्या घरात गटारीचे पाणी शिरत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे.



### शहराध्यक्ष जुबेर चाऊस यांचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

नगरपरिषद हद्दीतील भारत नगर परिसरात गटारीचे पाणी तुंबून बोअरवेल मध्ये जात आहे. याबाबत नगरपालिकेचे स्वच्छता निरीक्षक प्रमोद निकाळे यांना मागील सहा महिन्यांपासून वारंवार सांगून देखील ते तक्रारीची दखल घेत नाहीत. स्वखर्चातून साफसफाई करून घ्या अशी उत्तरे देतात. तात्काळ वरील मागणीची दखल घेऊन तातडीने साफसफाईसाठी पाऊले उचलावीत अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा या निवेदनातून देण्यात आला आहे.

## शेतकऱ्यांना बियाणे आणि खते याचा तुटवडा भासणार नाही - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**
**मुंबई/ प्रतिनिधी**/राज्यामध्ये आवश्यक तेवढा बियाण्याचा आणि खतांचा साठा उपलब्ध असून बियाणे आणिखते याचा कुठलाही तुटवडा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना भासणार नाही. साधारणपणे मागील वर्षांचा कल पाहता कुठले पीक कुठे कमी-अधिक प्रमाणात घेता येईल, याचा विचार करूनच त्या ठिकाणी बियाण्यांची उपलब्धता करून देण्यात आलेली आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे कृषी विभागाच्या राज्यस्तरीय खरीप हंगाम नियोजन आढावा बैठक मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. खरीप हंगाम आढावा बैठकीसंदर्भातआयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, कृषी मंत्री ड.माणिकराव कोकाटे, राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल, प्रधान सचिव प्रविण दराडे, प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी तसेच कृषी आयुक्त सूरज मांढरे उपस्थित होते.

### बोगस बियाणे विक्रेत्यांवर कठोर कारवाई करणार

बोगस बियाण्यांवर आळा घालण्यासाठी ‘साथी’ पोर्टल

मुख्यमंत्रीदेवेंद्र फडणवीस म्हणाले की, बोगस बियाण्यांवर आळा घालण्यासाठी महाराष्ट्राने केंद्र शासनाच्या ‘साथी’ या पोर्टलवर बियाणे नोंदणी करण्याचा नियम केला आहे. या नोंदणीमुळे हे बियाणे ट्रेसेबल होणार आहे. बोगस बियाणांबाबत कठोर पावले उचलण्यात येत असून यावर्षीपासून सर्व बियाणांची माहिती’साथी’ या पोर्टलवर आणण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. आता जवळपास ७० हजार क्विंटल बियाणे पोर्टलवर उपलब्ध असून ते ट्रेसेबल आहे. त्यामुळे यामध्ये काही गैरप्रकार झाला तर ते लक्षात येऊ शकणार आहे. पुढच्या वर्षांपासून १०० टक्के बियाणे ‘साथी’ या पोर्टलवर असेल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

खताच्या लिंकिंगबाबत कडक कारवाई

खतांच्या बाबतीत लिंकिंगची तक्रार सातत्याने येत असल्याचे सांगून मुख्यमंत्रीश्री. फडणवीस म्हणाले की,



लिंकिंग संदर्भात अतिशय कडक निर्णय घेण्यात आलेला आहे. आता प्रत्येक कृषी केंद्राच्या बाहेर बोर्ड लावून त्यावर फोन नंबर देण्यात येणार आहे. त्यामुळे लिंकिंगचा आग्रह झाला तर त्यासंदर्भात त्या नंबरवर फोन केल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल.एखाद्या कृषी केंद्रांनी पुरवठादार कंपन्याच्या सूचनेवरून लिंकिंग केल्याचेनिष्पन्न झाल्यास अत्यावश्यक वस्तू कायदा...

पुढील वृत्त पान २ वर..

## ‘विकसित कृषी संकल्प यात्रा’

## शेतकऱ्यांमध्ये कृषी तंत्रज्ञानाची जनजागृती करणार

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**
शेतकऱ्यांमध्ये आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची जनजागृती करण्यासाठी आणि त्यांच्या प्रगतीला चालना देण्यासाठी जिल्ह्यात दि. २९ मे २०२५ पासून ’विकसित कृषी संकल्प यात्रा’ होणार आहे. केंद्रीय कृषीमंत्री मा. श्री. शिवराजसिंह चौहान यांच्या नेतृत्वाखाली ही यात्रा १२ जून २०२५ पर्यंत जिल्ह्यात विविध ठिकाणी पोहोचणार आहे.



खरिप हंगामाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या यात्रेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांपर्यंत नवीन कृषी तंत्रज्ञान पोहाचवणे, त्याचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देणे, तसेच शासनाच्या विविध योजनांबद्दल माहिती देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे हा आहे. या मोहिमेअंतर्गत छत्रपती संभाजीनगर, पैठण, फुलंब्री, सिल्लोड आणि सोयगाव या तालुक्यांमधील एकूण १० गावांमध्ये विविध कृषी विस्तार कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या यात्रेतून शेतकरी, कृषी अधिकारी आणि शास्त्रज्ञ यांच्यात थेट संवाद साधला जाणार आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन करणे शक्य होईल. या कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी जिल्हा प्रशासनाने कृषी विभाग, महसूल विभाग, ग्राम विकास अधिकारी आणि स्थानिक कर्मचारी यांच्यासह संबंधित विभागांना सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. या मोहिमेमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आधुनिक शेतीची माहिती मिळून त्यांना समृद्धीकडे वाटचाल करण्यास मदत होईल.

२९ मे रोजी फुलंब्री आणि छत्रपती संभाजी नगर तालुक्यातील चौका ,गणोरी, किनगाव, वारेगाव ,विटेकर वाडी बिल्डा तसेच ३० मे रोजी कुंभेफळ, भांबरडा, दुधड, मुरूमखेडा, पिंपळखुंटा, लाड सावांगी या गावांमध्ये विकसित कृषी संकल्प यात्रा होणार आहे. ३१ मे रोजी छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील टोणगाव, हिवरा, जडगाव जडगाव -दोन, पिंपरी राजा ,आडगाव, येथे जाणार आहे. १ जून रोजी सय्यदपूर, औरंगपुरा, ढासला ,ढवळापुरी कासनापूर, फेरन जळगाव तर ३ जून रोजी शेलुद ,चारठा, हातमाळी, नायगव्हाण, लामकना, अंजनडोह या गावांमध्ये ही यात्रा जाणार आहे. ३ जून रोजी पैठण तालुक्यातील आडुळ, रजापूर, देवगाव, दाभरूळ, अंतरवाली, एकतुनी, तर ४ जून रोजी बिडकीन, शेकटा, तोंडोळी लोहगाव खुर्द, लोहगाव बुद्रुक मुलानी वडगाव तसेच ५ जून रोजी ढोरकिन ,कारकीन टाकळी, पैठण, धनगाव इसारवाडी, वाहेगाव आणि ६ जून रोजी पांगरा ,निलजगाव, पोरगाव ,लाखेगाव, पाडळी, खेर्डा या ठिकाणी ही यात्रा जाईल. ७ जून रोजी तालुका फुलंब्री मध्ये पिंपळगाव देव, पिंपळगाव वळण, आडगाव, सांजूळ, डोंगरगाव शिव ,शिरोडी खुर्द,८ जून रोजी पाल, पार्थी, डोंगरगाव कवाड, पीरबावडा गिरसावळी, मारसावळी बाबुळगाव तसेच ९ जूनला फुलंब्री तालुक्यातील बाबरा, वाहेगाव, निधोना, चिंचोली नकिब, कान्हेगाव, चिंचोली हिवरा तसेच १० जून रोजी सिल्लोड तालुक्यातील अन्वी, बनकिन्होळा, निल्लोड, गेवराई सेमी, भवन केऱ्हाळा, पळशी या ठिकाणी ही यात्रा जाणार आहे ११ जून रोजी सिल्लोड तालुक्यातील अन्वी, रहिमाबाद, आसाडी, सारोळा, पानवडद, पांगरी या ठिकाणी असणारा असून १२ जून रोजी सोयगाव तालुक्यातील फर्दापूर, वरखेडी बुद्रुक, जामठी, पिंपळा, जवळा, व रवळा या गावांमध्ये ही विकसित कृषी संकल्प यात्रा जाणार आहे. या यात्रेत शेतकऱ्यांनी सक्रीय सहभाग घेण्याचे आवाहन कृषि विज्ञान केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

## ग्रामीण भागात लोणचे बनविण्यासाठी गृहणीची लगीनघाई ; गावरान कैऱ्या झाल्या आंबट

**आत्ताच एक्सप्रेस**
**सोयगाव/प्रतिनिधी**/सर्वत्र खरिप पेरणीचे वेध लागले असून वरुणराजाची हजेरी लागण्यापूर्वी लोणचे बनविण्यासाठी गृहणीची लगीनघाई सुरू झाल्याचे दिसून येते आहे. परंतु दिवसेदिवस गावरान आमवृक्षाची कत्तल होऊन कलमीकरणाकडे सर्वांचाच ओढा वाढल्याने बाजारात गावरान कैऱ्याची वाणवा जाणवत असून आवक जेमतेम असल्याने त्याचे भाव दामदुप्पट झाल्याने लोणच्यासाठी लागणाऱ्या गावरान कैऱ्या आंबट झाल्याचे चित्र छत्रपती संभाजीनगर (ता.सोयगाव) सह सर्वत्र आठवडे बाजारात पाहवयास मिळते.

ग्रामीण व शहरी भागात पावसाळा व हिवाळा ऋतुत दररोजच्या भोजनासोबत आंब्याच्या लोणच्याचा सर्रास वापर केला जातो. भोजनाचा स्वाद वाढविण्यासाठी विशेष लोणच्यावर भर दिला जातो. शेतावर जाणारे मजुर, कामगार, कष्टकरी भाकरी, ठेच्यासोबत लोणच्यास विशेष पसंती देतात. सध्या गृहणी पेरणी कामास वेग येण्यापूर्वी सर्वत्र लोणचे बनविण्यासाठी घाई करतांना दिसत आहे. कैऱ्या सोबतच लोणचे साठविण्यासाठी चिनी मातीच्या बरण्या खरेदी करत असून कैऱ्या खरेदीपासून तर लोणचे तयार होईपर्यंत यंदा मोठा खर्च येत असल्याने गृहणीचा घरगुती हिशेब कोलमडला आहे.

लोणचे टाकण्यापूर्वी कैऱ्या फोडणे अनिर्वाह्य

असल्याने पन्नास रुपये शेकडाप्रमाणे कैऱ्याच्या फोडी करून घ्याव्या लागत आहे. त्यामुळे कैऱ्या फोडणाऱ्यांना सुगीचे दिवस आले आहे.



लोणच्यासाठी मीठ, मोहरी, हळद, तेल, लसुन, मिरे, लवंग, मेथी, तीळ आदी वस्तु लागत असल्याने दुकानांवरही गर्दी पाहवयास मिळते.

सुनिता पगारे (गृहीणी),’यंदा बाजारात लोणचे घालण्यासाठी लागणाऱ्या गावरान कैऱ्याची आवक खुप कमी असल्याने भावात दुप्पट वाढ झाली, त्यातच मसालेही महागले, कैऱ्या फोडणीचेही दर वाढून लोणच्याची चव महागली, परंतु भोजनाचा आस्वाद लोणच्या अभावी हरवल्यागत होतो. शेतावर जातांना भाकरीवर ठेचा अन् लोणचं असलं की झालं.’

# भुजबळांच्या एन्ट्रीमुळे मुंडेंचा प्रवेश अवघड

राज्याच्या राजकारणात मोठी घडामोड घडली आहे. राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांच्या गळ्यात मंत्रिपदाची माळ पडली आहे. यामुळे मागील ६ महिन्यांपासून बाजुला पडलेल्या भुजबळांचा पुनर्वसन झालं आहे. मात्र दुसरीकडे भुजबळांच्या एन्ट्रीमुळे धनंजय मुंडे यांचा मंत्रिमंडळातील प्रवेश कठिण झाल्याचं बोललं जात आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात काल नाट्यमय राजकीय घडामोडी पाहायला मिळाल्या आणि महायुतीच्या दुसऱ्या टर्ममध्ये मंत्रिपदापासून दूर राहिलेल्या छगन भुजबळ यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. छगन भुजबळांचं हे कम बॅक राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांच्यासाठी मात्र धोक्याचं ठरलं आहे. कारण भुजबळांच्या एन्ट्रीमुळे धनंजय मुंडेंसाठी मंत्रिमंडळाचे दरवाजे बंद झालेत का अशी चर्चा राज्याच्या राजकारणात सुरू झाली आहे. त्यामुळेच नाराज झालेल्या धनंजय मुंडेंची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी समजूत काढल्याचं पाहायला मिळतंय. वर्षा बंगल्यावर तिन्ही नेत्यांमध्ये मंगळवारी बैठक झाली.धनंजय मुंडेंसाठी मंत्रिमंडळाचे दरवाजे बंद? सूत्रांची माहिती भुजबळांना मंत्रिमंडळात घेण्यापूर्वी अजित पवारांसह पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी धनंजय मुंडेंची समजूत काढली असावी. मंत्रिमंडळात परत घेण्याबाबत धनंजय मुंडे होते आशावादी मात्र भुजबळांना मंत्री केल्यामुळे धनंजय मुंडेंचा पत्ता कायमचा कट झाल्याने ते नाराज असल्याची माहिती आहे.

# शेतकऱ्यांना बियाणे आणि खते याचा तुटवडा पान १ वरून...

किंवा तत्सम कायद्याच्या अंतर्गत त्यांच्यावर कारवाई केली जाईल, अशा इशाराही मुख्यमंत्र्यांनी दिला.कीड व्यवस्थापनासाठी डिजिटल शेतीशाळा

कीड व्यवस्थापन योग्य प्रकारे झाले पाहिजे, या दृष्टीने सगळी काळजी घेण्यात येत आहे. विशेषतः यावर्षी डिजिटल शेतीशाळा या देखील आयोजित करण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक तालुक्यामध्ये डिजिटल शेतीशाळा आयोजित करण्यात येणार आहेत. या डिजिटल शेतीशाळेच्या माध्यमातून कीड व्यवस्थापनसंदर्भात शेतकऱ्यांना मार्गदर्शनकरण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांचा डिजिटल मित्र – 'महाविस्तार' प

कृषी विभागाने एआय बेस्ड 'महाविस्तार' हे मोबाईल प लॉन्च केले असून या पवर शेतीच्या संदर्भातली सगळी माहिती आणि व्हिडिओज उपलब्ध आहेत. शेतकऱ्यांना शेतीतील लागवड, त्याची पद्धती, कीड व्यवस्थापन, त्याची पद्धती, कोणत्या टप्प्यावर काय वापरले पाहिजे, अशी सगळी माहिती, त्याचे व्हिडिओज त्या पमध्ये आहेत. या पमध्ये मराठी भाषेत चॅटबॉट असून त्यावर कुठलाही प्रश्न विचारला असता त्याला योग्य उत्तर मिळते. असा हा शेतकऱ्यांचा डिजिटल मित्र राज्यातील प्रत्येक शेतकऱ्यांनी आपल्या मोबाईलमध्ये डाऊनलोड करून शेतीसंदर्भातील सर्व माहिती मिळवावी, असे आवाहन मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी केले.

सिबिल अट नाही

शेतकऱ्यांना योग्य प्रकारे कृषीकर्ज पुरवठा झाला पाहिजे, यासंदर्भात बँकांनाहीनिर्देश देण्यात आले असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

बँकांनी सिबिल स्कोअरची अट ठेवणार नसल्याचे मान्य केलेले आहे. त्यामुळे एखाद्या बँक शाखेत जर सिबिल स्कोअरची मागणी करण्यात आली, तर त्या शाखेवर कारवाई करण्यात येईल. शेतकऱ्यांना वेळेत कर्जपुरवठा झाला पाहिजे, याकडे आमचे संपूर्ण लक्ष असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी आवर्जून सांगितले.

वातावरणातल्या बदलामुळे काही आपत्तीसंदर्भातील सूचना आधीच मिळावी यासाठी 'आयएमडी'च्या मदतीने पूर्वसूचनेसंदर्भातील व्यवस्था देखील तयार केली असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

# जागतिक मधमाशी दिनानिमित्त ग्रामोदय मध प्रकल्प संचालक अविनाश गायकवाड यांची मुलाखत

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/प्रतिनिधी /सुभान शहा/** डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची ग्रामोदय प्रकल्पाला भेट परागीभवनासाठी आता शेतकऱ्यांना मधमाशा पेट्या मिळणार आता भाडेतत्त्वावर ग्रामोदयने साकारला अनोखा उपक्रम मधुमक्षिका पालन उद्योग प्रशिक्षण बद्दल कार्यशाळा सावखेडा येथील ग्रामोदय मधुमक्षिका पालन प्रशिक्षण केंद्राला संभाजीनगर येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे जैवविविधता विभागाचे विद्यार्थी या एकदिवसीय कार्यशालेत सहभागी झाले होते. त्यांनीआज नुकतीच भेट देऊन मधमाशी या छोट्याश्या किटकबद्दल जाणून घेण्याचा प्रयत्न केला आणि ती सर्व माहिती जाणून घेत मीही धन्य झालो समोर विद्यार्थी पूर्ण माहिती मिळवत होते मि दैनिक आत्ताच एक्सप्रेस बातमी वार्तांकन करण्यासाठी तेथे गेलो होतो समोर या प्रकल्पाचे संचालक श्री बी एस,अविनाश गायकवाड हे मधमाशीच्या जीवन शैलीवर माहिती देत होते समोर विद्यापीठातील सर्व विद्यार्थी व प्राध्यापक वर्ग अगदी मंत्रमुग्ध होऊन ऐकत होते, या किटकबद्दलची इतकी सखोल माहिती गायकवाड सर सांगत होते आणि ती वार्तांकन करतांना मि धन्य पावलो एवढी प्रचंड भर माझ्या ज्ञानात भर पडली मधमाशी पालन हा असा कीटक आहे की तो माणसालाही चांगलं जीवन जगण्याची कला शिकवतो त्या प्रशिक्षण केंद्राला आम्ही सर्व टीम गेल्याबरोबर सर्वप्रथम गायकवाड सरांनी मधुमक्षिका पालन बद्दलची आमच्या मनातील भीती घालवण्यासाठी मधमाशांच्या पेट्या विषयी माहिती सांगायला सुरुवात केली त्यानंतर हळूहळू मधमाशांच्या जाती आहेत त्याबद्दल माहिती सांगितली त्यात एक राणीमाशी असते बाकीच्या सर्व कामगिरी मधमाशा असतात राणी माझी ही त्यांच्या त्या बनवलेल्या पोळी मध्ये अंडी घालण्याचे काम करते काम करी माशा या परिसरातील तीन ते चार किलोमीटर परिघात जाऊन मकरंद आणि पराग जमा करून आपल्या घरट्यामध्ये भरतात आणि त्याचबरोबर शेतकऱ्यांसाठी परागीभवनाचे कार्यकर्ता सर्वात महत्त्वाची माहिती आम्हाला त्या ठिकाणी मिळाली परागीभवन म्हणजे नेमकं काय असा माझा प्रश्न होता.

त्यांनी फार साध्या पद्धतीने उत्तर दिलं की निसर्गचक्र चालवण्यासाठी परागीभवनाची गरज असते आणि त्याशिवाय फलधारणा होत नाही म्हणून मधमाशी आहे. दिवसभरात शेकडो फुलावर जाऊन या फुलातून त्या फुलात त्या फुलातून त्या फुलात जात असताना नर्मदी जे परागनाचे एकत्रीकरण होते आणि आपल्याला अन्नधान्य व फळधारणा मोठ्या प्रमाणावर होता ना दिसते मधमाशांच्या एकूण किती जाती आहेत मधमाशांच्या असंख्य जाती आहेत त्यातल्या महत्त्वाच्या पाच आणि त्या म्हणजे सातेरी,फुलोरी ,काटेरी ,खोतया, आग्या, इत्यादी मग ह्या मधमाश्या पेटीत कसं काय बसू शकतात मी सांगितलेल्या मधमाशांच्या जाती पैकी दोन जाती ह्या अंधारात राहणाऱ्या जाती आहेत आणि त्या म्हणजे सातेरी होत्या आणखी एक नवीन जाती कसे झाले आहे ती म्हणजे इटलीयन या तीनही जाती अंधारात राहत असल्यामुळे पेटीत अंधार असतो आणि म्हणून ते आपलं कार्य आपली वस्ता स्थापन करून करतात मधमाशीच्या जन्माने मृत्यूची वयोमर्यादा किती मधमाशीच्या या वसाहतीमध्ये एकमेव दुवा म्हणजे त्यात एक राणीमाशी असते आणि राणी माशी चे कार्य केवळ मधमाशीची अंडी घालवण्यासाठी कार्यकर्ते अंडी घातल्यानंतर आळी अवस्थेमध्ये येण्यासाठी आणि मधमाशीचा जन्म होण्यासाठी एकूण १६ दिवसाचा कालावधी लागतो सोळाव्या दिवशी मधमाशी अवस्था निर्माण करून आपलं कार्य सुरू करते आणि सहा महिन्यापर्यंत तिच्या वयाची मर्यादा निसर्गाने दिले आहे राणी माशीची वयोमर्यादा ही तीन वर्षाचा कालावधी आहे.

मधमाशा चावल्याने काय फरक पडतो नागरिकांमध्ये उगाच मधमाशी बद्दल मोठी भीती आहे की मधमाशी चावते चावल्याने मृत्यू होतो यात काही तथ्य नाही मित्रहो मधमाशी तेव्हा चावते जेव्हा आपण तिला विशिष्ट पद्धतीने छेडछाड करतो अन्यथा हा फार शांत आणि गरीब कीटक आहे यात मधमाशा चावल्याने काही फरक पडत नाही हा थोडीशी सूज येते मात्र मधमाशी चावल्याचे अनेक फायदे आहेत डोळ्याचे मेंदूचे त्याचबरोबर संधिवात ऍलर्जीचे आजार असतील तर ते मधमाशी चावल्याने कमी होतात यातली आग्या माशी रागीट जात आहे ती समुद्रसपाटीपासून ५० ते ११०० फूट अंतरावर उंच आपली वसतच आपण करते ती चावली तरीही फार काही फरक नाही मात्र मोठ्या प्रमाणावर आग्या माशांनी चावा घेतल्यास मृत्यू संभवतो या व्यवसायापासून शेतकऱ्याचे कोणकोणते फायदे आहेत मित्रहो या व्यवसायापासून शेतकऱ्यांना मद मिळेल पराग मिळेल सौंदर्यप्रसाधनासाठी प्रोपोलीस मिळेल मेणाचे उत्पादन घेता येईल सर्वात महत्त्वाचं म्हणजे मोठ्या प्रमाणावर फळधारणा करण्याच्या दृष्टीने परागीभवन होईल त्यापासून सुमारे दीडपट उत्पन्न शेतकऱ्याचे वाढते ह्या शेतकऱ्यांच्या प्रतिक्रिया आहेत मधमाशीला चारापाणी करण्याची व्यवस्था कशी करतात तसे नाही मित्रहो मधमाशी ही फार स्वावलंबी कीटक आहे तो सकाळचे सूर्यकिरण मिळताच त्या दिशेने आपली कार्याची दिशा ठरवतो आणि निसर्गातील गवते जंगली वनस्पती या सर्व फुलांवरून आपल्या पायाच्या बकेटमध्ये पराक्रम जमा करतो आणि आपल्या पोटामध्ये मध साठवून आपल्या वसाहतीमध्ये घेऊन येतो तसेच निसर्गातील स्वच्छ खळखळणारे पाणी ठिबक सिंचन किंवा विहिरीतून पाझरणारे खडकातून पास जाणारे स्वच्छ पाणी हा कीटक जमा करून आपल्या वसाहत मध्ये भरतो एका पेटीतून किती मधाचे उत्पादन होते एका पेटीतून एका वर्षाला १० ते ३० किलो मधाचे उत्पादन मिळते आणि मधमाशी ने जमा केलेला मत हॅन्डमेड यंत्राद्वारे मधमाशीला धक्का न लागता आरामात काढून शास्त्रशुद्ध पद्धतीने त्याचे उत्पादन घेता येते या व्यवसायाचे महत्त्वाचे धोके आणि तोटे काय या व्यवसायाला महत्त्वाचे धोके फक्त आजची शेती पद्धती अलीकडच्या काळात भरमसाठ रासायनिक शेती कडे शेतकऱ्यांचा कल आहे त्यामुळे मोठ्या प्रमाणावर रासायनिक फवारण्या होतात रासायनिक खते वापरले जातात त्यामुळे या कीटकांना धोके निर्माण झाले आहेत या मुख्य कारणामुळे मधमाशी कीटक निसर्गातून संपुष्टात येताना दिसतो मात्र शेतकरी बांधवांना याची कल्पना नाही या मधमाशीमुळे शेती उत्पादनाला किती लाभ होतो याबद्दल अज्ञान असल्यामुळे आम्ही जनजागृतीचे कार्य हातात घेतले आहे. आणि जिल्ह्यात आणि मराठवाड्यामध्ये ठिकठिकाणी कार्यशाळा प्रशिक्षण देण्यासाठी मी जात असतो शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने सुद्धा मला निमंत्रण असतात आता अलीकडच्या काळामध्ये शेतकऱ्यांमध्ये बदल जाणवत आहे.

आता माझ्या शेकडो मधपेट्या शेतकरी हे भाडेतत्त्वावर घेऊन जातात आणि परागीभवन झाल्यानंतर मधमाशी पेटा परत आणून देतात एक मोठी जागृती अलीकडच्या काळात शेतकरी बांधवांमध्ये दिसत आहे आपण शेतकऱ्यांना काय संदेश द्याल यामध्ये मी एवढंच सांगेन की शेतकरी बांधवांनो मधमाशीच्या वसाहती जिथे कुठे आपल्याला निसर्गात आढळल्या तर त्यांची जाळपोळ दगड मारणे दूर करणे अशा हिसक पद्धतीने त्यांच्यावर अत्याचार करून मग घेऊ नका थोडसं शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेत आपण मधाचे उत्पादन घेऊ शकतो परागीभवनाचे कार्य होईल जैविक शेतीकडे वाटचाल कराल सकस अन्नधान्य स्वतःला आणि देशालाही उपलब्ध करून देऊ शकाल आणि आपले आरोग्य परिणामी देशाचेही आरोग्य सुदृढ करण्यास वाव मिळेल ही सर्व माहिती त्या विद्यापीठांचे विद्यार्थ्यांबरोबर माहिती घेत असताना मधमाशीचे कीटकाबद्दल एवढं सखोल ज्ञान मला मिळाले गायकवाड सर माहिती देत होते आणि मी ऐकत होतो.

खरंच आपण किती अज्ञान होतो याची प्रचिती मला आली आणि म्हणून भरमसाठ उत्पादन घेण्यापेक्षा गुणवत्तापूर्वक उत्पादन किती महत्त्वाचे आहे हे मी पण एक शेतकरी म्हणून समजून घेण्यात धन्य झालो माझे सुद्धा आव्हान शेतकरी बांधवांना राहील की आपण निश्चित प्रशिक्षण घ्या आणि शाश्वत शेतीकडे वाटचाल करा त्यानंतर आम्ही सर्व विद्यार्थ्यांसोबत जायकवाडी धरणाच्या पायथ्याला वनभोजन घेतले त्याचे आनंद वेगळाच होता आणि समुद्र सईर करून भगवान श्रीकृष्णाच्या दर्शनाचा लाभ झाला या कार्यशाळेत अविनाश गायकवाड यांनी बोलाची माहिती दिली या कार्यक्रमात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या जैवविविधता विभाग प्रमुख डॉक्टर शैलेश माखणीकर ,प्राध्यापक शाहजहान शेख ,मॅडम प्राध्यापक जैवविविधता समितीच्या गंगापूर तालुक्याच्या अध्यक्ष सौ ज्योतीताई गायकवाड ,प्रा स्वरा पैठणे मॅडम,श्री संकेत वैराळ, प्रमोद कुदळे, विजय राजपूत, नक्षत्र कैसल, प्रकाश गवई, मयुरी भगत ,वाल्मीक खेडकर, कृष्णा कांबळे, पुंडलिक पवार, धनराज चव्हाण, धर्मेंद्र टोमके, ग्रामोदय प्रकल्पाचे सेक्रेटरी संजय गायकवाड,चंद्रकांत केदारे,डॉ जान्हवी गायकवाड,सोनाली जगताप, ज्योती केदार आदी सावखेडा येथील केंद्र चालक साहेबराव केदारे, गणेश गुरुकुल, पोपट केदार आदींचा सहभाग होता शेवटी सर्व विद्यार्थ्यांनि आभार मानले.

# पावसाळ्यात विजांपासून रक्षण

भारतात जून महिन्यात मान्सुन ऋतूचे आगमन होते. यावेळी शेतकरी आपल्या शेतीच्या मशागतीला सुरुवात करतात. शेतमजूरही शेतीच्या विविध कामात व्यस्त होतात. या कालावधीत वादळ आणि वीजेच्या कडकडाटसह पावसाला सुरुवात झाल्यास शेतावर काम करणारे शेतकरी-शेत मजूर आणि इतरांना नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागते. दरवर्षी वीज पडून शेकडो नागरिकांना आपले प्राण गमवावे लागत होते. विशेषतः शेतकरी, मेंढपाळ यांना शेतात, जंगलात उघड्यावर वीज, वारा यांचा सामना करावा लागतो. या पावसाळ्यात पडणाऱ्या वीजेपासून स्वत:चा बचाव करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने सूचविलेल्या गोष्टींची खबरदारी घेतल्यास विजेच्या आपत्तीला तोंड देता येऊ शकते. तसेच विजेपासून स्वत:चे रक्षण करण्यासाठी सुरक्षितता कशी बाळगली पाहिजे हे आपण बघू या.

शेतात काम करीत असतांना वीजा कडाडत असल्यास शेतातील घराचा आसरा घ्यावा. पाण्यात असल्यास तात्काळ पाण्याबाहेर यावे. एखाद्या झाडाजवळ असल्यास झाडाच्या उंचीपेक्षा झाडापासून दुप्पट अंतरावर उभे राहावे. ओल्या शेतात रोपे लावण्याचे व अन्य काम करणाऱ्या व्यक्ती किंवा तलावात काम करीत असलेल्या व्यक्तीनी तात्काळ कोरड्या किंवा सुरक्षित स्थळी जावे. शेतामध्ये काम करीत असतांना सुरक्षित ठिकाणी आसरा घेतला नसेल तर शक्यतो जिथे असेल तिथेच रहावे. शक्य झाल्यास पायाखाली लाकूड, प्लॅस्टिक, गोणपाट सारख्या वस्तू अथवा कोरडा पाला पाचोळा ठेवावा. दोन्ही पाय एकत्र करुन गुडघ्यावर दोन्ही हात ठेवून डोके जमिनीकडे झुकवावे मात्र डोके जमिनीवर ठेऊ नये.

शेतात काम करतांना शेतकरी हे विविध कृषी औजारे हाताळत असतात. अशावेळी धातुपासून बनविलेल्या वस्तू यंत्र इत्यादीपासून दूर रहावे. गावाभोवती किंवा शेत, आवार, बाग-बगीचा आणि घर यांच्याभोवती तारेचे कुंपण घालू नये. कारण ते वीजेला सहजपणे आकर्षित करीत असते. धातूची दांडी असल्यास छत्रीचा उपयोग करु नये. वीजेच्या खांबाजवळ थांबू नये किंवा उभे राहू नये. तसेच झाडाखाली उभे राहू नये. उंच जागेवर झाडावर चढू नये. वीज वाहक असलेल्या रेडियेटर, स्टोव्ह, मेटल, लोखंडी पाईप आदी वस्तूपासून दूर रहावे. वीजा कडाडत असल्यास विद्युत उपकरणे बंद ठेवून शक्यतो घरातच रहावे, बाहेर पडू नये. पाण्याचे नळ, फ्रिज, टेलीफोन आदी वस्तूंना अशावेळी स्पर्श करु नये. तसेच वीजेपासून चालणाऱ्या यंत्रापासूनही दूर रहावे. कपडे वाळविण्यासाठी तारेचा वापर न करता, सुतळी अथवा दोरीचा वापर करावा.

कोसळणाऱ्या वीजेपासून संरक्षण करण्यासाठी मजबूत असलेले पक्के घर हे सर्वांत सुरक्षित ठिकाण आहे. शक्य असल्यास आपपल्या घरी वीज वाहक यंत्रणा बसवावी. टेलीफोन आणि विजेचे खांब किंवा टेलीफोन/टेलीव्हिजन टावर यापासून दूर रहावे. आपल्या घराशेजारी किंवा शेत जमिनीच्या आसपास कमी उंचीची झाडे लावावी.

मोठ्या प्रमाणात वीजा चमकत असल्यास किंवा कडकडाट सुरु असल्यास प्लग जोडलेली उपकरणे हाताळू नये. दूरध्वनीचा वापर अशावेळी करु नये. दोन चाकी वाहन, सायकल, ट्रक, ट्रॅक्टर किंवा नौका यावर असल्यास तात्काळ उतरुन सुरक्षित ठिकाणी जावे. अशा परिस्थितीत वाहनातून प्रवास करु नये. एखाद्याच्या शेतावर किंवा घराशेजारी उंच वृक्षाचे खोड अथवा फांदीवर तांब्याची एक तार बांधून तिचे दुसरे टोक जमिनीत खोलवर गाडून ठेवावे. म्हणजे हे झाड सुरक्षित होईल. वाहनातून प्रवास करत असल्यास वाहनातच रहावे. वाहनाच्या बाहेर थांबणे आवश्यक असल्यास धातुचे कोणतेही उपकरण हातात बाळगू नये. जंगलात गेले असल्यास कमी उंचीच्या व दाट झाडांचा आसरा घ्यावा. वृक्ष दलदलीची ठिकाणे अथवा पाण्याचे स्त्रोतापासून शक्यतो दूर रहावे किंवा आकाशाखाली राहण्यापेक्षा लहान झाडाखाली आसरा घ्यावा. मोकळ्या आकाशाखाली राहणे आवश्यक असल्यास खोलगट ठिकाणी रहावे. एकाच वेळी जास्त व्यक्ती एकत्र राहू नये. दोन व्यक्ती असल्यास किमान त्यांचात १० ते १५ फुट अंतर असणे आवश्यक आहे. पोहणारे किंवा मच्छिमारी करणाऱ्यांनी अशावेळी तात्काळ पाण्यातून बाहेर यावे.

विजेबाबत काही काल्पनीक समज आणि वास्तव

समजूत : वीज एकाच ठिकाणी दुसऱ्यांदा कधीही पडत नाही.

वास्तव : निर्जन स्थळी, उंच इमारतीवरील कळसावर वीज वारंवार कोसळते, जिथे वीज पडण्याची शक्यता जास्त असते, अशा जागा वादळी हवामानात टाळयाव्यात.

समजूत : पाऊस पडत नाही व ढगाळ हवामान नसेल, तर आपल्यावर वीज पडणार नाही.

वास्तव : वीज जवळ जवळ ५ कि. मी. अंतरावर सुध्दा पडू शकते. त्यामुळे हवामान ढगाळ नाही, पाऊस नाही, तरीही वीज पडू शकते, वज्राघात (जास्त ताकदीची वीज) कधी कधी २०-२५ किमी अंतरावर सुध्दा पडू शकते. अगदी दुर्मिळ प्रसंगी वीज ८० कि.मी. अंतरावर देखील पडल्याच्या घटना घडलेल्या आहेत.

समजूत : चार चाकी वाहनात असतांना रबर टायरमुळे विजेपासून संरक्षण होते.

वास्तव : वीज टायरपासून २ इंच दुरच राहते हे खरे आहे. पण खरे पाहता, संरक्षण होण्यास टायर बरोबरच धातूचे छप्पर व बाजूमुळे मदत होते. मोटरसायकल, सायकल, उघड्या टपाची चारचाकी वाहने, फायबर ग्लास, प्लॅस्टीकचे कवच असलेली चारचाकी वाहने यांना विजेपासून तसे संरक्षण मिळत नाही. शेतावरील ट्रॅक्टर ट्रॉली यांना जर छप्पर नसेल, तर त्यांनाही तसे संरक्षण मिळत नाही. पण त्यांना छप्पर असेल, तर ती वाहने सुरक्षित राहतात.

समजूत : ज्याच्या अंगावर वीज पडली आहे, ती व्यक्ती विद्युतभारीत असते आणि तिला स्पर्श केल्यास आपल्याला सुध्दा विजेचा झटका बसतो.

वास्तव : मानवी शरीर वीज साठवून ठेवू शकत नाही. त्यामुळे वीजबाधित व्यक्तीला स्पर्श करणे वा त्या व्यक्तीला प्राथमिक उपचार करणे, यात मदत करणाऱ्या व्यक्तीला कसलाही धोका नसतो. वरील कल्पित समज अत्यंत चुकीचा आहे. अशा अपसमजामुळे सीपीआर किंवा कृत्रिम श्वासोच्छवास असे प्राथमिक उपचार दिले गेलेले नाहीत. तर एखादी व्यक्ती वाचण्याची ९० टक्के शक्यता असूनसुध्दा ती मृत्युमुखी पडू शकते.

समजूत : जर पावसाळी वादळी हवामानात सापडलात, तर झाडाखाली आश्रय घ्यावा.

वास्तव : वीज पडून मृत्युमुखी पडण्याची जी प्रमुख कारणे आहेत, त्यात झाडाखाली थांबलेल्या लोकांचा दुसरा नंबर लागतो.

समजूत : पावसाळी हवामानात मी घरातच राहीलो, तर मी सुरक्षित आहे.

वास्तव : पावसाळी/वादळी हवामानात घरात राहणे हे निश्चितच चांगले आहे, पण पूर्ण सुरक्षित आहे असे नाही. वीज-प्रवाह ज्याच्यातून वाहू शकतो, अशा गोष्टी असुरक्षित आहेत. उदा. बाहेरुन घरात येणारी ओली पाऊलवाट, टेलिफोनच्या-टिव्हिच्या-विजेच्या तारा, विजेची उपकरणे, तसेच नळ (अगदी प्लॅस्टिकचे नळ-ज्यातून पाणी वाहत असते). लोखंडी दारे, खिडक्या इत्यादी, विजेचा कडकडाट होत असताना खिडकीजवळ उभे राहणे धोकादायक असते. त्यापेक्षा खोलीत आतील भागात राहणे जास्त सुरक्षित असते.

समजूत : मैदानी खेळ चालू असतांना विजेचा कडकडाट झाला, पाऊस आला, तरी आसरा घ्यायच्या ऐवजी खेळ संपेपर्यंत खेळत राहिले पाहिजे. धातूनिर्मित वस्तु, अंगावरील धातूचे दागिने, घड्याळ, पाठीवरील पिशव्या विजेला आकर्षित करतात.

वास्तव : मैदानी खेळात वीज पडून मृत्युमुखी पडणे/जखमी होणे ह्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. आयुष्यापेक्षा कुठलाही खेळ महत्त्वाचा नसतो. मैदानी खेळ खेळणाऱ्या व्यक्तीनी कडाडणाऱ्या विजेपासून संरक्षण मिळवण्यासाठी आधीच एक योजना बनवावी आणि ती सर्वांना माहिती करुन द्यावी. त्याप्रमाणे वागणे बंधनकारक करावे. वरील हवामानात विजेच्या कडकडाटासह पाऊस झाला. तर सुरक्षित जागेत त्वरित आसरा घ्यावा, लहान मुलांचे संरक्षण करणे, ही मोठ्याची जबाबदारी आहे, हे विसरु नये.

समजूत : धातूनिर्मित वस्तु, अंगावरील धातूचे घड्याळ, पाठीवरील पिशव्या विजेला आकर्षित करतात.

वास्तव : उंच, टोकदार आणि एकाकी जागा ह्यांच्यावर वीज पडणे ह्याची शक्यता जास्तीत-जास्त असते. त्यामुळे धातूनिर्मित वस्तू असल्या तरी काही फरक पडत नाही. डोंगर जरी दगडा-मातीचे असले, तरी त्यावर दर वर्षी अनेकदा वीज कोसळते. विजेचा कडकडाट सुरु झाला तर प्रथमतः चांगले संरक्षण मिळेल असा आसरा विनाविलंब घ्यावा. अंगावरील दागिने काढण्यात वेळ घालवू नये किंवा जिथे नीट संरक्षण मिळणार नाही, अशी जागा टाळावी. धातू विजेला जरी आकर्षित करत नसेल, तरी पण ज्यांची लांबी धातूनिर्मित वस्तू (तारेची कुंपणे, कठडे, वाहने इ.) धोकादायक असतात, त्यापासून दूरच राहवे. वीज जर कोसळली, तर अशा वस्तू वीज भारवाहक असल्याने ती प्रवाहित वीज अगदी १०० मीटर अंतरापर्यंत येऊन एखाद्या व्यक्तीला मृत्युदंड देवू शकते.

समजूत : वादळी हवामान, विजा कडकडत असतांना जर एखादी व्यक्ती त्यात अडकली, तर जमिनीवर लोटांगण घालणे हे सुरक्षित. जर वीज पडण्याची शक्ता असेल, तर टोकदार सुळक्याच्या जवळ ४५ च्या शंकुक्षेत्रात पोहोचल्याने वीजक्षतीपासून संरक्षण मिळते.

वास्तव : ही अगदी कालबाह्य व पूर्ण चुकीची समजूत आहे. खरे पाहता जमिनीवर बसावे, दोन्ही गुडघे एकत्र करून त्यात डोके खुपसावे आणि दोन्ही हातांनी पायांना मिठी मारून बसावे, जमिनीवर वीजप्रवाह वाहू लागल्यास तो ३० मीटर पर्यंतसुध्दा वाहतो आणि तो धोकादायक असू शकतो. जरी जमिनीवर झोपल्याने पडणाऱ्या विजेपासून संरक्षण मिळण्याचे प्रमाण वाढते, ही गोष्ट चांगली, तरी जमिनीवरुन प्रवाहित विजेचा धोका वाढतो, ही गोष्ट वाईटच. त्यामुळे कमीत-कमी उंचीवर असणे व जमिनीशी कमीत-कमी स्पर्श असणे, ह्याची सांगड घालायची असेल, तर वरील कृती करणे, हेच जास्त सुरक्षित. खरे पाहता, घराबाहेर जाताना वादळी हवामान टाळणे हेच महत्त्वाचे ठरते. हा उपाय अगदी शेवटचा.

समजूत : जर वीज पडण्याची शक्यता असेल, तर टोकदार सुळक्याच्या जवळ ४५ च्या शंकूक्षेत्रात पोहोचल्याने वीजक्षमतेपासून संरक्षण मिळते.

वास्तव : शंकुक्षेत्र संरक्षण हा समज चुकीचा आहे. उंच इमारती, सुळके ह्यांच्यावर वीज पडण्याची जास्तीत-जास्त शक्यता असते, तरीही त्याच्या जवळपास असणाऱ्या व्यक्ती, वस्तू यावर वीज पडणारच नाही असे नाही. त्यावरही वीज पडू शकते. शिवाय उंच इमारती, सुळके ह्यांच्यावर वीज पडली, तर त्याच्या ३० मीटरच्या परिघात असलेल्या व्यक्तीवर पण त्याचा आघात होऊ शकतो, आणि जर वीज ज्यावर पडली असते, त्या वस्तूला स्पर्श झाला किंवा वीजस्फोटाच्या परिघात जरी एखादी व्यक्ती असेल, तरी मृत्युदंड निश्चितच, त्यामुळे हे लक्षात घ्यावे की, विजेचा कडकडाट होत असतांना बाहेर जाणे टाळणे, हेच इष्ट. वीजप्रपात हा कधीही तथाकथित शंकुक्षेत्रात होऊ शकतो.

वीज पडून मृत्यू होण्याची भारतातील आकडेवारी फार मोठी आहे. दरवर्षी शेकडो लोक अशाप्रकारच्या नैसर्गिक आपत्तीमुळे आपले प्राण गमावतात. बऱ्याच घटनांमध्ये जागरुकता नसल्यामुळे मृत्यू होतात. अशा वेळी वरील स्वरक्षण पध्दतीचा अवलंब केल्यास वीजेपासून स्वत:चे व इतरांचे संरक्षण करण्यास नक्कीच मदत होईल.

**-जिल्हा माहिती कार्यालय जालना**

# नवीन सिंचन विहीरीत पुराचे पाणी शिरल्याने विहीर नामशेष

**आत्ताच एक्सप्रेस**
**फुलंब्री /प्रतिनिधी /सरफराज पटेल/** फुलंब्री तालुक्यातील बाबरा परिसरात मंगळवारी (दि. २०) रोजी मध्यरात्री अवकाळी पाऊस आणि विजेच्या कडकडाटणे जोरदार पाऊस झाल्याने परिसरातील बोधेगाव बु. चिंचोली नकिब येथिल महाराष्ट्र रोजगार हमी योजनेतील विहिरीचे मोठे नुकसान झाले आहे.

मंगळवारी रोजी मध्यरात्री अवकाळी पाऊस आणि विजेच्या कडकडाटणे जोरदार पाऊस झाल्याने परिसरातील बोधेगाव बु.येथिल रहिवाशी बिसमिल्लाखां समशेरखा पठाण यांच्या शेत शिवारात गट नं. ३९१ मधील वर्ष -२०२४/२५ मध्ये महाराष्ट्र रोजगार हमी योजनेतून सात पुरुस सिंचन विहीरीचे खोद कार्य पूर्ण झाले होते.व त्याला पक्के कठडे बांधण्यासाठी सहा ब्रास वाळू व तीन ब्रास खडीही विहिरीच्या जवळ आणून ठेवली होती परंतु मंगळवारी (दि.२० मे ) रोजी अचानक झालेल्या जोरदार पाऊसाने पूर आल्याने सर्व विहीर मातीने बुजल्याने विहीर नामशेष झाली असून बांधकामासाठी आणलेले साहित्यही पाण्याने वाहून गेल्याने जवळपास साडे तीन लाखाचे नुकसान झाले आहे.सदरील घटनेचा पंचनामा बोधेगाव बु. येथील तलाठी जयश्री तायडे यांनी घटनास्थळी जाऊन पंचा समक्ष केला आहे.



अन्य घटना ही चिंचोली नकीन येथिल रहिवाशी ज्ञानेश्वर सुपडू वाडेकर गट नंबर १८७ यांची नवीन बांधकाम झालेली विहीर ही अवकाळी पावसाच्या तडाख्याने पूर्ण पडली असून याचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

मी या विहिरीचे खोदकाम इतरांकडून तीन लाखाचे कर्ज घेऊन केले आहे. आतापर्यंत मला शासनाकडून केवळ सिंचन विहीर अनुदान म्हणून केवळ ४५ हजार रुपये मिळाले आहे. शासनाच्या या दिरंगाईमुळे विहिरीचे बांधकाम पूर्ण नं झाल्याने आज ही वेळ आली आहे.

-बिस्मिल्लाखां पठाण, शेतकरी बोधेगाव

शासनाने सदरील शेतकऱ्यांच्या नुकसान झालेल्या विहिरीचा पंचनामा करून आर्थिक मदत मिळवून द्यावी.
गणेश हिरे,शेतकरी बोधेगाव

# संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत विभागीय तपासणी

**आत्ताच एक्सप्रेस**
**सोयगाव/प्रतिनिधी/** छत्रपती संभाजीनगर - संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत सन २०२२-२३ ची विभागीय तपासणी जिल्ह्यातील तालुका कन्नड - नादरपुर, तालुका सोयगाव - जरांडी ग्रामपंचायतीची तपासणी आज करण्यात आली. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या वतीने तपासणी करण्यात आलेल्या ग्रामपंचायती मध्ये शाळा अंगणवाडी शौचालय, सार्वजनिक शौचालय, घनकचरा सांडपाणी व्यवस्थापन, परिसर स्वच्छता, वैयक्तिक स्वच्छता, वृक्षारोपन, जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना ग्रामपंचायतच्या वतीने विविध नाविन्यपूर्ण राबविण्यात आलेल्या उपक्रमाची पाहणी केली.




तपासणी पथकात जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत तथा जल-जीवन मिशनचे प्रकल्प संचालक राजेंद्र देसले, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे अधीक्षक अभियंता दीपक कोळी, जिल्हा माहिती अधिकारी डॉ मिलिंद दुसाने, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( रोहयो) उद्धव होळकर, विस्तार अधिकारी दिलीप घुमरे पंचायत समिती सोयगाव चे गट विकास अधिकारी दादाराव अहिरे जिल्हा कक्षाचे माहिती शिक्षण सल्लागार सतीश औरंगाबादकर क्षमता बांधणी तज्ञ राजेंद्र सोनवणे गट समन्वयक संतोष जाधव जरांडी ग्रामपंचायतच्या सरपंच स्वाती दिलीप पाटील, उपसरपंच संजय पाटील, ग्रामपंचायत अधिकारी सुनील मंगरूळे, माजी सरपंच वंदना पाटील तसेच ग्रामपंचायतचे सन्माननीय सदस्य ग्रामस्थ उपस्थित होते.

# मोहंद्री येथे पती-पत्नीच्या भांडणात पत्नी ठार

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड/प्रतिनिधी/** २१ कन्नड तालुक्यातील पिशोर जवळील मोहंद्री येथे शेतात मजूर म्हणून काम करणाऱ्या जोडप्यापैकी पतीने पत्नीच्या डोक्यात काठी घालून खून केला. या खुनाला पत्नीकडे आढळलेला एक मोबाईल कारणीभूत ठरला. देवडे (वय २७) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. याविषयी अधिक माहिती अशी की, पिशोर जवळ मोहंद्री येथे निवृत्त शिक्षक अवचितराव भीमराव जाधव यांच्या शेतात मध्य प्रदेश येथील बोरगाव ता पढाना जिल्हा खंडवा येथील संजय महिकाल देवळे व पिंकाबाई संजय देवळे हे जोडपे यांच्याकडे एक वर्षापासून सालगडी म्हणून शेतात कामाला होते.

मंगळवारी (दि.२०) रात्री बिरोबाचा खोरा शिवारातील गट क्र. २२१ मधील पत्र्याच्या शेड मध्ये मयत महिला व तिचा पती यांच्यामध्ये नवीन मोबाईलच्या कारणावरून पत्नीसोबत भांडण झाले. यात आरोपीने महिलेस मोबाईल कोणी दिला? कोणाचा आहे? याबाबत विचारपूस केली. याचा राग धरून संजय देवळे याने त्याच्या पत्नीस काठीने बेदम मारहाण केली व तो बाजूला दुसऱ्या शेडमध्ये झोपी गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी शेतमालक अवचित राव जाधव यांना शेता शेजारील बाळू जाधव यांनी आपल्या शेतात जखमी अवस्थेत महिला असल्याची माहिती दिली. यावेळी त्यांना महिला निपचित पडलेली असल्याचे दिसून आले. त्यांनी याविषयी संजय देवळे याच्याकडे विचारपूस केली असता त्याने रात्री झालेली घटनाक्रम सांगितला. या महिलेला तत्काळ शेतातून पिशोर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

येथे डॉ. अमोल गिरी यांनी महिलेला तपासून मृत घोषित केले. शरीरावर, डोक्यावर मारहाणीच्या खुणा बघून डॉ. गिरी यांनी महिलेचा मारहाणीत व गळा दाबून खून झाले असल्याचा अंदाज व्यक्त केला. मृत महिलेचा पती संजय देवळे याच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला ताब्यात घेण्यात आले. सहायक पोलिस निरीक्षक शिवाजी नागवे, फॉरेन्सिक टीमचे सिताकांत पळसकर, संदीप जोनवाल पोलिस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी जावून पंचनामा केला.

यावेळी अतिरिक्त पोलिस अधिक्षक अन्नपूर्णासिंह उपविभागीय पोलिस अधिकारी विजय ठाकूरवाड, यांनी घटनास्थळास भेट दिली.पोलिस उपनिरीक्षक विश्वजित फरताडे हे अधिक तपास करत आहे.

# किरकोळ विक्रेत्यांकडे सुध्दा स्मार्ट पेमेंटची सुविधा

**- सुट्या पैशांच्या जाचातून ग्राहकांची झाले सुटका - सर्वत्र डिजिटल पेमेंट इको**

**आत्ताच एक्सप्रेस**
**सोयगाव/प्रतिनिधी/**सिस्टिममुळे आपल्या दैनंदिन जगण्यातील व्यवहाराची पद्धत बदलत चालली आहे. आत्ता शहराप्रमाणेच तालुक्याच्या ग्रामीण भागातील चहा, किराणा दुकान, भाजीपाला, भंगारवाला, फळं विक्रेता , पाणी पुरी - भेळ, चायनीज कॉर्नर, इतर व्यवसाय किंवा मोठ्या शोरूम मध्येही 'युपीआय'द्वारे ऑनलाइन व्यवहार होत असल्याचे पहावयास मिळते आहे. त्यामुळे डिजिटल इंडियात शहराप्रमाणेच ग्रामीण भागातही स्मार्ट पेमेंटला प्राधान्य दिले जात आहे. तर, किरकोळ व्यावसायिकांची व ग्राहकांची सुट्या पैशाच्या कटकटीतून सुटका झाली आहे.

व्यवहारातील एक रुपयांपासून हजारो रुपयांचे व्यवहार स्मार्ट पेमेंटद्वारे कॅशलेस करत आहेत. त्यामुळे घरात किंवा खिशात

प्रत्येक ठिकाणी ऑनलाइनला प्राधान्य

डिजिटल इंडियात शहराबरोबर ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात ऑनलाईन सुविधांना प्राधान्य दिले जात आहे. शहरातील मोठमोठ्या शोरूमबरोबर पाणीपुरीसह इतर किरकोळ व्यावसायिकांकडे सुद्धा डिजिटल पेमेंट करण्याची सुविधा आहे. आता तर, ग्रामीण भागातही ऑनलाईन व्यवहार करण्याला प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे खिशात रक्कम असो अथवा नसो, व्यवहार मात्र, वेळेत पूर्ण होत असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे.देखील रोख रक्कम ठेवणे नागरिक टाळत असल्याचे दिसून येत आहे. शहरासह ग्रामीण परिसरात सुट्या पैशांचे टेन्शन मिटली आहे. छोट्या विक्रेत्यांकडेही स्मार्ट पेमेंटची सुविधा उपलब्ध झाली आहे. ग्रामीण भागात आधारकार्डवरून बँकेतील पैसे काढून दिले जातात. परंतु, घरात मोबाइल सुविधा असल्याने वीज मीटरचे बिल, टेलिफोन बिल, ट्रॅव्हल कंपन्यांचे, विमानाचे, रेल्वेचे तिकीट, सिलिंडरची रक्कमदेखील ऑनलाइन व्यवहारांद्वारे स्वीकारण्यास सुरुवात झाली. त्याचबरोबर ग्रामीण परिसरातील चहा, भेळ सेंटर, किराणा दुकान, भाजीपाला, भंगारवाला, चायनीज कॉर्नर, इतर व्यवसायांसाठी वापर वाढला आहे. परिणामी, सुट्या पैशांचे टेन्शन मिटली असल्याचे चित्र दिसून येत आहे. ऑनलाइन खरेदी विक्री वाढली असून या व्यवहारातही कॅशलेस व्यवहार केला जात आहे. ऑनलाईनद्वारे एखादी वस्तु प्राप्त झाल्यानंतर त्याचे पेमेंट ऑनलाइन अदा केले जात आहे.

# मंत्री मंगलप्रभात लोढा यांची अभिनव संकल्पना : उद्योजकासाठी प्रशिक्षण मेळावा आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी/** जिल्ह्यातील सूक्ष्म व लघु उद्योजकांना उद्योग व्यवसायात येणाऱ्या अडीअडचणींबाबत उद्योजक प्रशिक्षण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. दे आसरा फाउंडेशन व कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत दि.२३ मे देवगिरी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर येथे सकाळी ११ ते २ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगर येथील विविध क्षेत्रातील लघु व सूक्ष्म उद्योजक प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. या उद्योजक मेळाव्यामध्ये श्री प्रकाश आगाशे, प्रोग्रॅम मॅनेजर, दे आसरा फाउंडेशन, शिवप्रसाद जाजू, सीईओ, पवन ग्रुप व डॉ. आनंद गोडसे कन्सल्टिंग हेल्थ सायकॉलॉजिस्ट हे उपस्थित सूक्ष्म व लघु उद्योजकांना मार्गदर्शन करणार आहेत. या लघु उद्योजक प्रशिक्षण कार्यक्रम सहभागींना डिजिटल प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे.

दिनांक २३ मे, २०२५ सकाळी ११:०० ते ०२:०० वाजे पर्यंत कार्यक्रमस्थळी उपस्थित रहून या संधीचा जास्तीत जास्त लघू उद्योजकांनी लाभ घ्यावा असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील सूक्ष्म व लघु उद्योजकांना उद्योग व्यवसायात येणाऱ्या अडीअडचणींबाबत जसे की, फंडिंगचे विविध प्रकार, लोन प्रपोजल, लोन प्रक्रिया यांची माहिती,आपला व्यवसाय कसा उभारावा आणि त्याची ओळख कशी निर्माण करावी, यात व्यवसायाची आर्थिक स्थिती कशी सुधारायची याबाबत तज्ञ मार्गदर्शन व तरुण व्यावसायिक व उद्योजकांना संवाद कौशल्य व खंबीरपणा टीमवर्क व सर्जनशीलतेच्या माध्यमातून तज्ञ प्रोत्साहनकरिता कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मा.ना.श्री मंगलप्रभात लोढा, यांच्या अभिनव संकल्पनेतून रोजी महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि दे आसरा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योजक मेळाव्या करिता उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# पावसामुळे महावितरणचे मोठे नुकसान

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी/** अवकाळी पावसाने छत्रपती संभाजीनगर शहर व ग्रामीण भागात महावितरणचे मोठे नुकसान झाले.छत्रपती संभाजीनगर शहर मंडलात उच्चदाब वाहिनीचे ११ व लघुदाब वाहिनीचे ३० विद्युतखांब कोसळले. तर तीन वितरण रोहित्रांची हानी झाली. छत्रपती संभाजीनगर ग्रामीण मंडलात उच्चदाब वाहिनीचे २१३ व लघुदाब वाहिनीचे ३८१ विद्युतखांब कोसळले. तर २१ रोहित्रांची हानी झाली. सर्व खांब व रोहित्र उभारून वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला. सर्व खांब व रोहित्रे पुन्हा उभारून वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला.

# विवाहित महिला मुलीसह बेपत्ता

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड / प्रतिनिधी/** कन्नड तालुक्यातील नादरपुर येथील एक विवाहिता तिच्या दोन वर्षाच्या मुलीसह बेपत्ता झाल्याची तक्रार विवाहितेच्या पतीने पिशोर पोलिस ठाण्यात दाखल केली. काजल भरत काथार (वय २७) असे बेपत्ता महिलेचे नाव आहे. याविषयी दाखल तक्रारीचा आशय असा: तक्रारदार भरत काथार हे नेहमीप्रमाणे गुरूवारी (दि.१४) शेतात कामाला गेले होते. संध्याकाळी घरी आल्यानंतर पत्नी काजल व मुलगी जान्हवी (वय २) हे दोघे घरात दिसून न आल्याने त्यांनी त्यांच्या नऊ वर्षीय मुलाकडे विचारपूस केली असता त्याची आई मूलीला घेऊन एका दुचाकीवर कोठेतरी गेल्याची माहिती दिली. रात्री उशिरापर्यंत विवाहिता व मुलगी घरी न आल्याने दुसऱ्या दिवशी सगळीकडे शोध घेतला परंतु दोघे कोठेही आढळून न आल्याने भरत काथार यांनी पिशोर पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली. बेपत्ता विवाहितेची उंची साडेपाच फूट,माध्यम बांधा, रंग सावळा, गोल चेहरा, अंगात गुलाबी ड्रेस अशा वर्णनाची महिला कोणाला आढळल्यास पिशोर पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# युध्द पातळीवर काम करत महावितरणकडून वीजपुरवठा सुरळीत

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी/** अवकाळी पावसाने आठवडाभर जिल्ह्यात विविध ठिकाणी विद्युत वाहिन्यांवर झाडे कोसळून तसेच बिघाड होऊन वीजपुरवठा खंडित झाला. महावितरण कर्मचाऱ्यांनी युद्ध पातळीवर दुरुस्तीचे काम करून वीजपुरवठा सुरळीत केला.

वैजापूर तालुक्यातील शिऊर परिसरात मंगळवारी दुपारी ५ वाजता वादळी वारे व विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस झाला. पावसामुळे ३३ केव्ही लोणी वाहिनीवर जरुल फाटा, खंडाळा, कोल्ही येथे वीज पडून पिन इन्सुलेटर फेल झाले. त्यामुळे या वाहिनीवर बिघाड होऊन शिऊर, लोणी व भादली या उपकेंद्रांचा वीजपुरवठा खंडित झाला. महावितरणच्या अभियंते, कर्मचाऱ्यांनी लगेचच धाव घेतली आणि युद्धपातळीवर काम सुरू केले. रात्रभर पावसात ३८ किमी लांबीच्या या वाहिनीची चिखल तुडवत तपासणी केली. पाऊस सुरू असल्याने वीज कर्मचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागला. मात्र रात्रीच्या अंधारातही बॅटऱ्यांच्या उजेडात काम सुरूच होते. प्रत्येक विद्युत खांबाची पाहणी केली. त्यात ३५ पिन इन्सुलेटर खराब झालेले आढळले. ते बदलून ४० गावांतील सुमारे १५ हजार ग्राहकांचा वीजपुरवठा बुधवारी दुपारी दीड वाजता सुरळीत केला.

झाडाच्या फांद्या पावसात हटवून वीजपुरवठा पूर्ववत

१९ मेच्या रात्री जोरदार वारा व वादळामुळे ४०० केव्ही वाळूज उपकेंद्रातून निघणाऱ्या ३३ केव्ही रुरल फिडरवरील रांजणगाव पोल व तुर्काबाद ही दोन उपकेंद्रे बंद पडली होती. वीज कर्मचाऱ्यांनी तात्काळ धाव घेऊन पेट्रोलिंग केली. ४०० केव्ही उपकेंद्राच्या एका बाजूने कंपनीच्या भिंतीलगत मोठे झाड लाईनवर पडले होते. त्यामुळे तारा तुकडे होऊन पडल्या. हे काम पूर्ण करण्यासाठी वेळ लागणार असल्याचे लक्षात आल्यावर दोन्ही उपकेंद्रात ३३ केव्ही वीरगुजर लाईन व तुर्काबाद उपकेंद्रातून बॅक फिडिंग फक्त गावठाण व एक्सप्रेस फिडर सुरू करण्यात आले. कर्मचाऱ्यांनी रात्रीच तारेवरील पडलेले झाड व तारांमध्ये अडकलेल्या फांद्या काढल्या. हे करण्यास पहाटेचे ४ वाजले होते. ज्या ठिकाणी तारा तुटल्या तेथे एमआयडीसीस जाणाऱ्या तीन ३३ केव्ही फिडरची क्रॉसिंग होती. रात्री हे काम करणे शक्य नसल्याने २० मे रोजी करण्याचे ठरले. मात्र एमआयडीसीतील औद्योगिक ग्राहकांना वीजपुरवठा करणाऱ्या ३३ केव्ही एम सेक्टर, तिल्योसॉट व एंड्युरन्स हे क्रॉसिंग असणारे तीन फिडर बंद केल्याशिवाय तारा जोडणे शक्य नव्हते. त्यासाठी ३ तास लागणार होते. पण औद्योगीक ग्राहक बाधित होणार होते. या लाईनवर पुढे दोन उपकेंद्रावर असणारे सर्व कृषिपंप व पाणीपुरवठा योजना बंद होते. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी मसिआचे अध्यक्ष अर्जुन गायकवाड यांना सर्व परिस्थिती समजून सांगितली. त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत सर्व उद्योजकांचे मन वळवून कामासाठी तीन तास विद्युतपुरवठा बंद करण्यास होकार दिला. त्यानंतर पडत्या पावसाची तमा न करता ठरलेल्या वेळेच्या अर्धा तास आधीच म्हणजे अडीच तासात सायंकाळी साडेपाच ते आठ वेळेत काम पूर्ण करून वीजपुरवठा पूर्ववत केला.



चिखलात वाहन फसूनही वीज पूर्ववत

शुकवारी (१६ मे) भेंडाळा शिवारात वादळी पावसामुळे खांबावर झाडे पडल्यामुळे १० ते १२ गावांचा विद्युतपुरवठा खंडित झाला. मात्र काळ्या मातीची जमीन असल्याने चिखलात काम करणे जोखमीचे होते. खांब वाहून नेणारे वाहन चिखलात फसत होते. तरीही मात्र महावितरण कर्मचाऱ्यांनी कौशल्याने खांब उभा केला आणि प्रतिकूल परिस्थितीत ७०० ग्राहकांचा वीजपुरवठा शनिवार सायंकाळी सुरू केला.

# नाचनवेल परिसरात अवकाळी पावसाने झोडपले घरावरील पत्रे उडाली झाडे पडले




**तहसीलदार , कृषी अधिकारी यांची नुकसानग्रस्त आंब्याची पाहणी**

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड / प्रतिनिधी/** कन्नड तालुक्यातील नाचनवेल परिसराला मंगळवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास अवकाळी पावसाने झोडपून काढले. यात काही घरावरील पत्रे उडाली असून अनेक ठिकाणी झाडे उनमळून पडली वादळी वाऱ्यामुळे झाडाला लागलेली आंबे खाली पडल्याने नुकसान झाले. मोहरा शिवारातील संजय पिंपळे यांच्या शेतातील अवकाळी पावसामुळे आंबे खाली पडल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले

या नुकसान झालेल्या आंब्याची तहसीलदार विद्याचरण कडवकर व कृषी अधिकारी शिरसाट यांनी प्रत्यक्ष पाहणी केली यावेळी भाऊसाहेब थोरात यांच्या छतावरील पत्रे उडाल्याने त्यांचे देखील नुकसान झाले.

यावेळी मंडळाधिकारी विकास वाघ, ग्रामसेवक मनोज पवार, सरपंच समाधान गाडेकर, दीपक बिरारे कृषी सहाय्यक, शिवाजी थोरात, राजेंद्र राजपूत, कैलास राजपूत, तलाठी जी, जी .खिल्लारे, पत्रकार रवींद्र पिंपळे आधी सह शेतकरी वर्ग उपस्थित होता.

# संक्षिप्त

## विद्यार्थ्यांना विविध प्रमाणपत्र वेळेत उपलब्ध होण्यासाठी 'दाखला आपल्या दारी' उपक्रम

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ या कायद्याची अंमलबजावणी होण्यासाठी इयत्त १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील प्रवेशासाठी लागणारे आवश्यक प्रमाणपत्रे विहित वेळेत मिळण्यासाठी दाखला आपल्या दारी हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. नुकतेच इयत्ता १० वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थ्यांना पुढील प्रवेशासाठी लागणारे आवश्यक प्रमाणपत्रे उदा. वय अधिवास व रहीवास प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र, रहीवासी प्रमाणपत्र इत्यादी प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना वेळेत मिळण्यासाठी व प्रवेश सुरु झाल्यावर होणारी संभाव्य गर्दी टाळण्यासाठी दाखला आपल्या दारी  हा उपक्रम जिल्ह्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत दि. २६ ते २७ मे, २०२५ पर्यंत राबविण्यात येणार असल्याचे उपजिल्हाधिकारी सा. प्र. यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात प्रतिज्ञा



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिनानिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात  निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांच्या प्रमुख उपस्थितीत दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनाची शपथ घेण्यात आली.यावेळी अधिकारी-कर्मचाऱ्यांना दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिनाची शपथ देण्यात आली. यावेळी अधिकारी तसेच कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## स्वयंसहाय्यता बचत गटांना ३१ मे पर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील नोंदणीकृत स्वयंसहाय्यता बचत गटांना ९ ते १८ अश्वशक्तीचे मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने ९० टक्के अनुदानावर वाटप करण्यात येतात.सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील सदर योजनेतंर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील पुरुष व महिला स्वयंसहाय्यता बचतगटांकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.

जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील नोंदणीकृत स्वयंसहाय्यता बचत गटांनी  सहायक आयुक्त, समाज कलयाण, जालना (डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन जालना) कार्यालयात सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत दि.३१ मे २०२५ रोजी पर्यंत प्रस्ताव मागविणेबाबत  सहायक आयुक्त, समाजकल्याण यांनी आवाहन केले आहे.

## माय भारत योजनेद्वारे नागरी संरक्षण स्वयंसेवक नोंदणी सुरु

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** माय भारत, भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, (नवी दिल्ली ) अंतर्गत नागरी संरक्षण स्वयंसेवक म्हणून नोंदणी करण्यासाठी देशभरातील तरुणांना सक्रियपणे एकत्रित केले जात आहे. हा देशव्यापी उपक्रम तरुण नागरिकांना राष्ट्रीय कार्यात सहभागी करून घेण्याचा आणि विशेषतः आणीबाणी व संकटाच्या वेळी महत्त्वाची भूमिका पार पाडण्यासाठी सक्षम करण्याचा प्रयत्न करत आहे. नैसर्गिक आपत्ती, अपघात, सार्वजनिक आणीबाणी आणि इतर अनपेक्षित परिस्थितीत नागरी प्रशासनास सहकार्य करू शकणारे एक प्रशिक्षित, प्रतिसादक्षम व लवचिक स्वयंसेवक दल तयार करणे, हे या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. सद्याची परिस्थिती आणि वाढत्या सुरक्षा चिंता लक्षात घेता, एक मजबूत समुदायाधारित प्रतिसाद यंत्रणा उभारण्याची निकड आहे. नागरी संरक्षण स्वयंसेवक स्थानिक प्रशासनाला बचाव व निर्वासन, प्रथमोपचार अशा विविध सेवा देण्यामध्ये मोलाची मदत करतात. नोंदणीसाठी अधिकृत संकेतस्थळः https://mybharat.gov.in नोंदणी प्रक्रिया सोपी आणि सर्वांसाठी खुली आहे. तरुणांनी पुढे येऊन या राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा युवा अधिकारी प्रणीत सांगवीकर यांनी केले आहे.

# मनपाने अवैधरित्या कुत्रे पकडल्याबाबत प्राणी क्लेश निवारण समितीची संबंधितावर गुन्हे दाखल करण्याची मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** मिळालेल्या माहितीनुसार जालना महानगरपालिकेने जवळपास १०० च्या वर कुत्रे जालना शहरातुन अवैध्द पध्दतीने उचलून सिंदखेड राजा रोडवर सोडले या प्रकारणी जवाबदार असणाऱ्यावर गुन्हे दाखल करन्याची मागणी प्राणी क्लेश निवारण समितकडुन करण्यात आलीय. या विषयीची तक्रार कदीम पोलिसांत देण्यात आलीय.मोकाट कुत्र्यांनी केलेल्या हल्यात एका लहान मुलीचा मृत्यू झाला. त्यामुळे जालना महानगर पालिकेने कुत्रे पकडण्याची मोहिम राबविली. शिकलकरी, तसेच खाजगी लोकांना ही जबाबदारी महानगर पालिकेने दिली होती. ही मोहिम ८ ते ११ मे २०२५ या काळात सुरू होती. त्यांनी ९ व १० मे रोजी भटकी कुत्री पकडली, हे कुत्रे पकडण्या संदर्भात महानगरपालिकेकडे तक्रार अर्ज आल्यांनतर त्यांनी ही मोहिम सुरू केली. खाजगी लोकांना कुत्रे पकडून बाहेर सोडण्यासाठी महानगरपालिकेने सांगीतले. ही मोहिम चालू असतांना महानगरपालिकेने कुठल्याच प्रकारची काळजी घेतली नाहये. तसेच त्यांना कुत्रे पकडून सोडण्याचा अधिकार नसताना त्यांनी अनिमल बर्थ कन्ट्रोल (प्राणी जन्म नियंत्रण दर) चे उल्लंघन केलय. अमानुष पध्दतीने या खाजगी लोकांनी फासाच्या सहाय्याने भटकी कुत्रे पकडली. त्यातील ३ ते ४ कुत्रे मरण पावलेत. ज्या फिमेल डॉगीने म्हणजे कुत्रीने नवजात पिलांना जन्म दिला होता. अशा कुत्रींना देखील उचलून नेले. त्यामुळे नवजात कुत्रींची पिल्ले आईविना मरत आहेत. महानगरपालिकेने कोणत्याच नियमाचे पालन केले नसून क्रूर पध्दतीने भटया कुत्र्यांना उचलून सिंदखेड राजा रोडवर जंगलात सोडले. राहत्या ठिकाणाहुन हे कुत्रे सोडले त्यामुळे कुत्र्यांवर उपासमारीची वेळ येत असून तसेच कुत्री हायवेवर पळतांना गाडीखाली पण जातायेत.

२२.नोव्हेंबर २०१७ रोजी देखील सी.ओ. म्हणून सध्याचे आयुक्त संतोष खांडेकर हे होते, त्यांनी जालना शहरात कुत्रे पकडण्याची मोहिम सुरू केली होती. नगर पालिकेने अवैध पध्दतीने नियमाचे उल्लंघन करून भटकी कुत्री पकडून सोमनाथ जळगावच्या जंगलात सोडून दिली. त्यावेळेस देखील त्यांनी हे काम खाजगी खिकलकरी लोकांना दिले. या संदर्भात तत्कालीन जिल्हाधिकारी शिवाजी जोंधळे यांच्याकडे  २२.११.२०१७ रोजी तक्रार केली होती. आ. मेनका गांधी यांनी फोन करून जिल्हाधिकारी शिवाजी जोंधळे व सी.ओ यांना त्वरीत मोहिम बंद करण्यास सांगीतले. याच पध्दतीने घटना पुन्हा घडली.आयुक्त संतोष खांडेकर उप आयुक्त प्रियंका राजपूत मॅडम व स्वच्छता निरीक्षक पंडीत पवार, महानगरपालिका कर्मचारी तसेच खाजगी लोक यास जबाबदार असल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे.त्यांनी अमानवीय पध्दतीने कुत्र्यांना वागणुक दिली, त्यातील ४ ते ५ कुत्री पकडतांना मेली. कुत्र्याला पकडतांना फासाने पकडून सिंदखेड राजा रोडवर जंगलात सोडली. त्यामुळे त्यांनी प्राणी कल्याण कायदा १९६० चे उल्लंघन करून गुन्हा केलाय. त्यामुळे आयुक्तांसह सर्वावर सेक्शन ४२८ आणि४२९ भारतीय न्याय संहिता (इंडीयन पिनल कोर्ट) तसेच सेक्शन ११ (१) आणि ११ (१) (जे) पी.सी.ओ. ॲक्टनुसार कायदेशिर कारवाई करावी करण्याची तक्रारदारांनी मागणी केलीय.१० मे रोजी गांधीनगर भागात काही लोकांनी जवळपास १० ते १२ कुत्र्यांना दगडाखाली व लाकडाखाली मारून जायबंद केले व ठार मारले, व इतरत्र फेकून दिले... या संदर्भात चौकशी करून त्यांचेवर गुन्हे दाखल करावे अशी मागणी प्राणी कलश निवारण समितीने केलीय.



# संभाजी नगर प्रभाग क्रं.१ मधील रोडचे काम न करता कॉन्ट्रक्टरने उचले बिल

**जिल्हाधिकारीकडे चौकशीची मागणी - डॉ. रामकृष्ण भोडोंने**

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी/** प्रभाग क्रं.१ मधील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत जालना महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रं.१ मधील सुरेश कांबळे यांच्या घरापासून ते दिलीप चौधरी यांच्या घरापर्यंत ट्रिमिक्स रस्ता तयार करणे बाबत संबंधित कॉन्ट्रॅक्टरला २०१८ पासून वर्कऑर्डर मिळालेली आहे. सदरील कामाचा कालावधी आठ वर्षे होऊनही सदरील रोडचे काम करण्यात आलेली नाही. सदरील काम न करता संबंधित कॉन्ट्रॅक्टरने सदरील रोडची कामाची बिले उचलली आहे. याची उच्च स्तरीय चौकशी करून संबंधित कॉन्ट्रॅक्टर व संबंधित अधिकार्याविरूद्ध कार्यवाही करून सदरील रोडचे काम १५ दिवसात सुरू करण्यात यावे नसता उपोषण करण्यात येईल असा इशारा असे निवेदन जिल्हाधिकारी जालना यांना समाजसेवक डॉ.रामकृष्ण भोडोंने यांनी दि.२०/०५/२०२५ रोजी दिले आहे. जिल्हाधिकारी यांनी चौकशी करण्याचे आश्वासन दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील दिपक इंगोले साहेब यांनी सुद्धा २ दिवसात महानगरपालिकेला पत्र देवून कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन दिले.

डॉ.भोडोंने यांनी निवेदनात म्हटले आहे की, याबाबत आम्ही महानगरपालिका, जालना कार्यालयासमोर तीन वेळा साल सन २०२२, २०२४, आणि २०२५ साली आमरण उपोषण केले. याबाबत आम्ही अनेक वेळा निवेदने सुद्धा दिली. तसेच संबंधित कर्मचार्यांना सुद्धा विनंती केली. त्यांना फोनवर सुद्धा संपर्क साधला.महानगरपालिकेचे इंजिनिअर साऊद यांनी २०२५ मध्ये रोडचे स्थळ पाहणी करून गेले.

काम झाले नाही असे आयुक्त साहेबांना सांगितले.मग रोडचे काम झाले नसतांना, सदरील कामांचे बिल कॉन्ट्रक्टरला कसे काय दिले? सदरील काम ६ महिन्याच्या आत पूर्ण व्हायला हवे होते, परंतु तसे न होता ८ वर्षांपासून

सदरील काम पूर्ण झाले नाही. सदरील काम ६ महिन्यात न केल्यास कॉन्ट्रॅक्रला ३००/- रोज दंडाची तरतूद आहे. सदरील कॉन्ट्रॅक्टरला नोटीस का देण्यात आलेली नाही. सदरील कॉन्ट्रक्टरचे लायसन्स का रद्द केले नाही असेही निवेदनात म्हटले आहे. १५ दिवसात जर रोडचे काम चालु झाले नाही तर आमरण उपोषण जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात येईल असा इशाराही त्यांनी दिला.






छगनरावजी भुजबळ यांचा मंत्रीमंडळात समावेश जालन्यात जल्लोषात स्वागत



नूतन वसाहत भागातील डीपीला मोठ्या प्रमाणावर आग लागली असून डीपी सर्व जळून खाक झाली ताबडतोब इंजिनियर गहाणे यांनी दखल घेऊन डीपी चे सामान मागवले व लाईनमनला सांगण्यात आले की लगेच काम सुरू करा छायाचित्र किरण खानापुरे

# राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ३०० वी जयंतीनिमित्त भाजपाची जिल्हा कार्यशाळा संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** भारतीय जनता पार्टी जालना महानगर जिल्हा व जालना ग्रामीण जिल्हा तर्फे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्त (ता.२१) कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेश पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले आणि आयोजित केलेल्या प्रदर्शनी बघून कार्यकर्त्यांनी त्यांच्या जीवन कार्य आत्मसात केले. यावेळी भाजपा प्रदेश वक्ते किशोरजी शितोळे, सदस्य नोंदणी प्रभारी किरणजी पाटील, जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे, जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांची प्रमुख उपस्थिती होती.या कार्यशाळेस मार्गदर्शन करतांना प्रदेश वक्ते श्री.शितोळे म्हणाले की, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मस्थान महाराष्ट्रातील असून अहिल्यानगर जिल्ह्यातील चौंडी या ठिकाणी आहे. अहिल्यादेवी यांचा जीवन प्रवास अत्यंत खडतर होता. अनेक संकटे त्यांच्यावर आली. परंतु त्यांनी न डगमगता धैर्याने या सर्व संकटांना तोंड दिले असे हि ते म्हणाले.

महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले की, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी अनेक सामाजिक कामे केली, अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला, अनेक नद्यांवरील घाटांची दुरुस्ती केली, अनेक नवीन घाट बांधले, महिला सबल आणि सक्षम होण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. भारतीय जनता पार्टीतर्फे अनेक कार्यक्रमांचे आयोजन राबविण्यात येत आहेत. यामध्ये राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी निर्माण केलेले घाट, मंदिर, स्मारक यांची स्वच्छता करणे, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या जीवनावरील चित्ररथ, शोभायात्रा, महिला मेळावे, युवा मेळावे, महिला मॅरेथॉन, पथनाट्य, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या कार्यावर प्रभावित होऊन सामाजिक कार्य करणाऱ्या महिला व सोशल मीडियातील प्रभावी व्यक्ती यांचे संमेलन, राजमाता अहिल्यादेवी यांच्या जीवन व कार्यावर प्रदर्शनी करणे हे सर्व कार्यक्रम भाजपा पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी नागरिकांना सोबत घेऊन वरील सर्व कार्यक्रम चांगल्या पद्धतीने करावेत आणि राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आदरांजली द्यावी, असे आवाहन जिल्हाध्यक्ष श्री.दानवे यांनी यांनी केले.

जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे म्हणाले की, अहिल्यादेवींनी ३०० वर्षांपूर्वी दिलेले योगदान, जनविकासाची केलेली कामे राज्यभर पोहोचविण्याचा प्रयत्न मोदी सरकार आणि राज्यातील फडणवीस सरकार करत आहे. अहिल्यादेवींचे कार्य शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचविण्याचे ध्येय मनात ठेवून त्यांचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी आपला भाजपा परिवार कटिबद्ध आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे कार्य घराघरात पोहोचवूया; वारसा जपत समाजसेवेकरिता कटिबद्ध होऊया, पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी साहेब व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या संकल्पनेतून राजमाता अहिल्यादेवींच्या प्रेरणादायी कार्याच्या जागर २१ मे ते ३१ मे या कार्यकाळात आपणास संपूर्ण जिल्ह्याभरात राबवयाचे आहे. यासंदर्भात उपस्थितांना मार्गदर्शन केले.



यावेळी प्रदेश निमंत्रित सदस्य राजेशजी राऊत, रामेश्वर पाटील भांदरगे, विजय कामड, विमलताई आगलावे, ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सोपान पेंढारकर, मा.जिल्हाध्यक्ष अशोक पांगारकर, सतीश जाधव, जिल्हा सरचिटणीस देविदास कुचे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा संध्याताई देठे, शुभांगीताई देशपांडे, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष भागवत बावणे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष भागवत बावणे, अरुणाताई जाधव, अश्विनी पवार, शारदा पांढरे, अर्चना सोसे, वैशाली कुटुंबे, छाया घोरभांड, दिपाली बिन्नीवाले सर्व नवनिर्वाचित मंडळ अध्यक्ष व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सूत्रसंचालन जिल्हा सरचिटणीस सुनील पवार यांनी केले तर आभार कपिल दहेकर यांनी मानले.

हे पत्रक  मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813